महाराष्ट्रातील जनतेचा आक्रोश, दैनिक नांदगांव

# आवाज

संपादक : भगवान सोनवणे

RNI Reg. No.: MAHMAR/2014/66104 ■ वर्ष – ११ वे ■ अंक क्र. – २५५ ■ गुरूवार दि. ०१ मे २०२५ ■ किंमत – १ रूपया ■ पाने – ४





**दै. आवाज वृत्तसेवा...**
सटाणा येथील लोकनेते पंडितराव धर्माजी पाटील मराठा इंग्लिश स्कूल या शाळेतील कलाध्यापक राकेश पगार यांनी १ मे महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त केलेले आकर्षक फलक चित्रण.. **(छायाचित्र : प्रशांत कोठावदे)**

## जायखेडा पोलीसांची धडक कारवाई; गावठी दारूच्या हातभट्ट्या उद्ध्वस्त

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**प्रशांत कोठावदे, सटाणा :** तालुक्यातील अंतापुर येथील मोसम नदी लगतच्या परिसरात जायखेडा पोलीसांनी धडक कारवाई करीत छुप्या पध्दतीने अनाधिकृतरित्या सुरू असलेल्या गावठी दारूच्या हातभट्ट्या उद्ध्वस्त केल्या आहेत. या कारवाईत शेकडो लिटर रसायनासह १ लाख ७१ हजार रुपयांचा मुद्देमाल नष्ट करण्यात पोलीसांना यश आले असून, चार संशयितांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे.



अंतापूर येथे मोसमनदी परिसरातील दाट झाडा झुडपात गावठी दारूच्या हात भट्ट्या लाऊन मोठ्या प्रमाणात गावठी दारू तयार करण्यात येत असल्याची गुप्त माहिती जायखेडा पोलीसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे जायखेडा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर काळे यांनी पोलीस कर्मचारी रविद्र कोकणी, अरुण वन्स, पृथ्वीराज बारगळ, श्री शिरोळे, क्षीरसागर आदी सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाड टाकली असता गावठी हात भट्टीची दारू तयार करण्यासाठीचा कच्चा रसायनाचा साठा तसेच दारू तयार करण्यासाठी लागणारी साधनसामग्री व गावठी हातभट्टीची दारू मोठ्या प्रमाणात मिळून आली.

पोलीसांनी साधन सामग्रीसह दारू बनवण्याचे साहित्य व गावठी हातभट्टीवरील दारूचे तयार रसायन असे एकूण १ लाख ७१ हजार रुपयांचा मुद्देमाल नष्ट केला. या प्रकरणी अनुसयाबाई सोनवणे, नंदाबाई गवळी, रेखाबाई गवळी, गायत्री गवळी या चौघांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

## नगरसूलच्या शेख वस्तीवर जबरी चोरीची घटना घरफोडी करुन तीन लाखांचा ऐवज चोरीस

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी** येवला तालुक्यातील नगरसुल येथील माळवाडी परिसरातील शेख वस्ती-वर मंगळवार ता.२९ च्या मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी केलेल्या जबरी घरफोडीत सुमारे अडीच ते तीन लाख रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना घडली आहे.येथील बालम मेहबूब शेख यांच्या शेतातील घरी त्यांचे सर्व कुटुंब घरासमोर ओट्यावर झोपलेले होते. मध्यरात्री दीड-दोनच्या सुमारास अंधारात घराचा मागील दरवाजा तोडून चार ते पाच चोरट्यांनी घरात प्रवेश केला.घरातील कपाट, पेट्या, डबे उघडून सर्वत्र सामानाची उचका पाचक करून रोकड व सोन्या-चांदीचे दागिन्यांची चोरी केली



आहे.घरातील लोखंडी पेट्या व पर्स व कपाटातील ड्रावर घरापासून काही अंतरावर नेऊन त्यातील रोकड व दागिने लंपास केले. बालम शेख यांनी ट्रॅक्टरची ट्रॉली खरेदीसाठी एक लाखाची रक्कम घरात ठेवली होती. त्यांच्या मुलाने देखील व्यवसायातून मिळालेली पंचवीस ते तीस हजार रुपये रोख रक्कम.तसेच महिलांचे दीड तोळ्यांचे सोन्याचे दागिने असा एकूण अडीच ते तीन लाख रुपयांचा ऐवज चोरीस गेला आहे.निव्वळ शेतीवर उदरनिर्वाह अवलंबून असलेल्या या गरीब कुटुंबाचे मोठे नुकसान झाल्याने शेख कुटुंब हतबल झाले आहे.पोलिसांनी चोरीचा छडा लाऊन जेरबंद करण्याची मागणी येथील ग्रामस्थांनी केली आहे. वस्त्यांमध्ये असलेली घरे चोरटयांनी लक्ष केल्यामुळे या परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान नगरसूल येथील पोलीस चौकी सतत बंद असून येथे एक हि पोलीस कर्मचारी उपस्थित राहत नाही.शेख वस्तीवर अक्षय प्रकाश योजनेचे कनेक्शन नसल्याने अंधाराचा फायदा चोरटयांनी घेतला.व शेख कुटुंबाची लूट झाल्याबद्दल नाराजी येथील रहिवाशांनी व्यक्त केली आहे.

## जम्मू काश्मीर येथे पर्यटनासाठी गेलेले चाळीसगावचे पर्यटक थोडक्यात बचावले



**दै. आवाज वृत्तसेवा...**

यशवंतराव ताडगे चाळीसगाव प्रतिनिधी :- जम्मू काश्मीर येथे पर्यटनासाठी गेलेल्या चाळीसगाव येथील राष्ट्रीय सहकारी शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक आर्किटेक्ट धनंजयराव चव्हाण आणि मित्र अनिल पाटील, भागवत पाटील, बळवंतराव वाबळे, सुनिल कुंवर, सुरेश निकम यांच्यासह मोठ्या संकटांपासून थोडक्यात बचावले. हल्ला झाला त्या दिवशी ते पहलगाम येथे मुक्कामी होते. सुदैवाने ते बचावले. त्यानंतर हे सर्व पर्यटक शुक्रवारी २५ रोजी दुपारी चाळीसगाव येथे सुखरुप घरी पोहोचले.

१७ एप्रिल रोजी चाळीसगाव येथून त्यांनी काश्मीरकडे प्रस्थान केले. गुलमर्ग, सोनमर्ग, दूधपतरी, पहलगाम आणि श्रीनगर यासारख्या ठिकाणी त्यांनी भेटी दिल्या. काश्मीर येथे झालेल्या ढगफुटीमुळे अनेक महत्त्वाचे रस्ते खचल्यामुळे त्यांना नियोजित सहलीमध्ये बदल करावा लागला. नियोजित सहलीप्रमाणे ज्याठिकाणी दहशतवादी हल्ला झाला त्याठिकाणी म्हणजे बेताब पॉइंटला मित्रांसह ते २२ रोजी भेट देणार होते मात्र अनेक रस्ते खचलेले असल्याने लांबच्या मार्गाने प्रवास करावा लागत असल्याने त्यांना आपल्या सहलीच्या नियोजनात बदल करावा लागला. कश्मीर येथे पर्यटनासाठी गेलेले चाळीसगाव येथील पर्यटक. त्यामुळे त्यांनी पहलगाम येथील २२ एप्रिलची नियोजित भेट टाळून ती २१ रोजी दिली. पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याच्या आदल्या दिवशी याठिकाणी भेट दिली. व त्या दिवशी मुक्कामही केला.

घटना घडण्याच्या दिवशी म्हणजे २२ रोजी सकाळपर्यंत पहलगाम येथे मुक्कामी असल्याची आपबीती आर्किटेक्ट धनंजय चव्हाण यांनी खडतर प्रवास करत सहल घेतली आटोपती सहलीच्या नियोजनाप्रमाणे पहलगाम येथून मुगल घाट मार्गे दिवाण व कटरा येथे जाण्यासाठी सकाळी पहलगाम येथून वैष्णवदेवीचे दर्शन घेण्यासाठी पोहोचले .मात्र रस्त्यातच त्यांना पहलगाम हल्ल्याची बातमी कळाली. दहशतवादी हल्ला झाल्यामुळे मंदिराचे सर्व दरवाजे देखील बंद करण्यात आल्याने त्यांना वैष्णवदेवीचे दर्शनही घेता आले नाही. खडतर प्रवास करत सहल आटोपती घेत कटरा येथून दिल्लीला गेले आणि दिल्लीहून जळगाव येथे ते पोहोचले.

## शिक्षकांची राज्यव्यापी आयडॉल बँक तयार करणार - शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे

**दै. आवाज वृत्तसेवा...**

छत्रपती संभाजीनगर दि.३० (विमाका) : शालेय जीवनापासून विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासावर शासनाचा भर आहे. देशाचा उद्याचा नागरिक घडविण्यात आई-वडीलानंतर शिक्षकाची भूमिका महत्त्वाची आहे. शिक्षण आनंददायी, शिक्षण गुणवत्तापूर्ण यासोबतच शिक्षण भाकरीचे, शिक्षण राष्ट्रीयत्वाचे हे ब्रिद घेऊन शिक्षण विभाग काम करत आहे. प्रत्येक विद्यार्थी आपल्या क्षेत्रात सक्षमपणे उभा रहावा, यासाठी शिक्षकांनी झोकून देत काम करावे, शासन आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. शिक्षकांची राज्यव्यापी आयडॉल बँक तयार करणार असल्याचे प्रतिपादन शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी आज केले. आयडॉल शिक्षकाने आपल्या नाविन्यपूर्ण उपक्रमाला आपल्या शाळेपुरते मर्यादित न ठेवता राज्यभर हा उपक्रम कसा पोहचेल यासाठी काम करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

देवगिरी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सभागृहात छत्रपती संभाजीनगर विभागातील आयडॉल शिक्षकांशी आयोजित संवाद कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी आमदार प्रदिप जैस्वाल, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित, विभागीय मंडळाचे अध्यक्ष अनिल साबळे, शिक्षण उपसंचालक प्रकाश मुकुंद, सहायक संचालक रविंद्र वाणी, शिक्षण उपनिरीक्षक डॉ. सतिष सातव उपस्थित होते.

शिक्षण मंत्री श्री. भुसे म्हणाले, आयडॉल शिक्षकांनी राबविलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमाची शासनाकडून दखल घेण्यात येईल. आपल्यासमोर असलेल्या अडचणीतून मार्ग काढून या शिक्षकांनी नाविन्यपूर्ण उपक्रमाच्या माध्यमातून




आपल्या शाळेची वेगळी ओळख निर्माण केली आहे. प्रत्येक जिल्हयाच्या शैक्षणिक विकासासाठी रोडमॅप तयार करण्यात आला आहे. येणाऱ्या कालावधीत शाळांना भौतिक सुविधेसह डिजीटल सुविधा देण्यासाठी शासन कटिबध्द आहे. शिक्षकांनी राबविलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांना शासनाचे पूर्ण पाठबळ असल्याचे श्री भुसे यांनी सांगितले.

राज्य शासन येणाऱ्या शैक्षणिक वर्षात आठवीच्या पुढील विद्यार्थीनींना सायकलसाठी अर्थसहाय्य तसेच शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांचे हेल्थ कार्ड तयार करणार आहे. हेल्थ कार्ड उपक्रमाच्या माध्यमातून तपासणीत गंभीर आजार आढळला तर त्या विद्यार्थ्याला शासकीय योजनेतून सर्व उपचार शासन करेल. शालेय पातळीवर पुर्वी विविध १५ समित्या कार्यरत होत्या. या समित्यांची संख्या १५ वरुन ४ समित्यांवर आणली आहे. शिक्षकावरील अशैक्षणिक कामाचा भार कमी करण्यात आला आहे. त्यामुळे शिक्षकांना शिक्षणावर अधिक लक्ष केंद्रीत करता येईल, असे श्री. भुसे म्हणाले.

शालेय विद्यार्थ्यांच्या सहली शेती, कारखाना, किराणा दुकान, बँक, दवाखाना याठिकाणी सहलीचे आयोजन करण्यात येईल. बालवयात मुलांना याबाबी जाणून घेण्याची उत्कंठा असते त्यासाठी अशा सहली निश्चितपणे विद्यार्थ्यांना आनंद देतील. स्पर्धा परीक्षेच्या निकालात ५० टक्के विद्यार्थी हे जिल्हा परिषद व नगरपालिका शाळेत शिक्षण घेतलेले आहेत. ही सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे. 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' या उपक्रमासोबतच जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी सुरु केलेला शिक्षणाचा दशसुत्री उपक्रम राबविण्यात येईल. शिक्षक, पालक संवाद उपक्रम प्रभावीपणे राबवावा लागेल.

मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अभियान पुरस्काराने शाळांचा गौरव

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जळगांव मेटे जि. छत्रपती संभाजीनगर, बोरगव्हान जि. परभणी, देवीपिंपळगाव जि. जालना या शासकीय तर बहीरजी नाईक स्मारक विद्यालय, वसमत जि. हिंगोली, सरस्वती साधना विद्यालय आर्वी जि. बीड, संत ज्ञानेश्वर विद्यालय केरेवाडी जि. परभणी या खाजगी शाळांचा शालेय मंत्री श्री. भुसे यांच्या हस्ते मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अभियानातून पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. यावेळी विभागातील सर्व शिक्षणाधिकारी, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य, वेतन अधिक्षक, शिक्षक, शिक्षण विभागातील अधिकारी उपस्थित होते.

# राजकीय पुढारी तुपाशी व कामगार उपाशी; कामगार जाए तो जाए कहा

**दै. आवाज वृत्तसेवा...**

कामगारवर्ग हा भारताचाच नाही तर संपूर्णजगाचा आधारस्तंभ आहे,परंतु तो दिवसेंदिवस ढासळतांना दिसत आहे.दरवर्षी १ मे हा दिवस जगभरात आंतरराष्ट्रीय कामगार दिवस म्हणुन साजरा केल्या जातो.आज जगाचा विचार केला तर ८० टक्के लोक कामगारांमध्ये मोडतात यात अनेक क्षेत्रातील कामगार वर्ग दिसुन येतात.शेतीतील कामगार असो, कारखाण्यातील कामगार असो किंवा इतर कोणत्याही क्षेत्रातील कामगार असो त्याची अत्यंत दयनाअवस्था दिसून येते.आज विकसीत, विकसनशील,गरीब या संपूर्ण देशातील कामगारांवर जिवन-मरणाचा प्रश्न उद्भवत आहे.आज भारताचा विचार केला तर सध्याच्या परिस्थितीत लोकसंख्येच्या बाबतीत स्फोटक आकडा दिसून येतो.भारताची लोकसंख्या १४० कोटींच्या पुढे गेल्याचे युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फंडच्या आकडेवारी नुसार दिसून येते.म्हणजेच चीनच्या लोकसंख्येपेक्षा २९ लाखाने जास्त असुन जगात प्रथम क्रमांकावर आहे. त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत सरकार व राजकीय पुढाऱ्यांनी कामगारांची सर्वो तोपरी मदत करण्याची नितांत गरज आहे. आपल्या देशाचा विचार केला तर मुठभर राजकीय पुढाऱ्यांजवळ अरबो-खरबो रूपयांची चल-अचल संपत्ती आहे ही संपत्ती राजकीय पुढाऱ्यांनी कामगारांच्या प्रती उपयोगात आणली तर एक मदतीचा हात समजल्या जाईल. कामगार जगाचा शिल्पकारमानल्या जातो. तर शेतकरी हा अन्नदाता मानल्या जातो.यांची भुमिका देशासाठी व जगासाठी महत्त्वाची असते. आज मंदिर-मज्जीद, कारखाने, सरकारी इमारती,ताजमहाल, गुरूद्वारा, बौद्ध विहार,कुतुबमिनार,संसद भवन, अयोध्येतील राममंदिर मोठ-मोठी गडकील्ले जे आपण पहात आहोत ते संपूर्ण कामगारांच्या मदतीने बनवीण्यात आले. परंतु आज शिल्पकारचे हाल-बेहाल होत असल्याचे दिसून येते.कामगार हा जगाचा मोठा आधारस्तंभ आहे. कामगार नाही तर काहीच नाही. हीबाब भारतासह जगाने लक्षात ठेवली पाहिजे. कामगारवर्गामध्ये अशा अनेक अडचणी दीसुन येतात की त्यांचा उदरनिर्वाह होने अत्यंत कठीण झाले आहे.आपण जर भारतातील ईपीएस-९५च्या दिड करोड निवृत्त पेंशन धारकांचा विचार केला तर त्यांना १००० ते ३००० रूपयांपर्यंत पेन्शन मिळत आहे.पेंशन वाढण्याच्या आशेने निवृत्त पेंशन धारक मोठ्या आशेने सरकारकडे पहात होते.परंतु केंद्र सरकारने त्यांच्या मागणीकडे पाठ फिरविल्याचे दिसून येते.अल्पशा पेंशनमध्ये त्यांचा उदरनिर्वाह व औषधोपचार होवु शकत नाही. त्यामुळे त्यांच्यापुढे आजही जिवन-मरनाचा प्रश्न उपस्थित आहे. असंघटीत कामगारांचा विचार केला तर त्यांची परीस्थिती आनखीनच कठीण व भयावह आहे. त्यामुळे भारतासह जगात आजच्या परिस्थितीत कामगारवर्ग अत्यंत दु:खी आणि चिंतेत दीसुन येतो. २०१९ ते २०२१ हे वर्ष संपुर्ण जगासाठी महामारीने जखडलेले वर्ष ठरले.आज-ही शेतकऱ्यांची गंभीर परिस्थिती आ-हेच त्याच्या दुप्पटीने कामगारांची गंभीर परिस्थिती दिसून येते.भारत हा शेतीप्रधान देश आहे त्याचप्रमाणे बहु लोकसंख्येचा देश आहे. कामगार वर्ग मेहनतीने देशाच्या विकासासाठी व इतर कामांसाठी हातभार लावतो परंतु त्या कामाचा मोबदला तुटपुंजा मिळतो. त्यामुळे आता समान कायदा, समान अधिकार समान संपत्ती, समान वेतन,समान पेंशन यावर विचार करण्याची वेळ आलेली आहे. एका कुटुंबाला रहाण्याकरीता कीती जागा असावी,एका कुटुंबाजवळ उदरनिर्वाह करण्याकरिता कीती संपत्ती असावी. यावर माननीय प्रधानमंत्री, राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, लोकसभा अध्यक्ष, सुप्रिमकोर्ट, हायकोर्ट यांना विचार करण्याची वेळ आली आहे. कारण ही दु:खदायीबाब आहे की ज्यांना आपण लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी, समाजसेवक म्हणतो अशा आजि-माजी राजकीय पुढाऱ्यांच्या संपत्तीचा विचार केला तर यांच्याजवळ आज अरबो-खरबो रूपयांची चल-अचल संपत्ती दीसून येईल. म्हणजेच राजकीय पुढारी तुपाशी आणि कामगार उपाशी अशी परिस्थिती आज भारतात सर्वत्र दिसून येते. यामुळेच देशात महागाई, बेरोजग-ारी, शिक्षणाचा अवाढव्य खर्च, आरोग्य सुविधा इत्यादीसह अनेक ज्वलंत समस्यांनी जन्म घेतला आहे राजकिय पुढारी नेहमी समान अधिकाराची भाषा करतात परंतु ही सर्व राजकीय खेळी असते ही बाब सर्वांनाच लक्षात आहे. त्यामुळे करोना काळात झालेले नुकसान व जगातील सध्याची युद्धजन्य परिस्थिती पहाता आणि पुढे येणारी समस्या पहाता समान अधिकार, समान वेतन, समान संपत्ती यावर चर्चा करून नवीन कायदा सरकारने अमलात आणायला हवा. तेव्हाच कामगारवर्ग व गरीब वर्गाला दीलासा मिळेल अन्यथा श्रीमंत हा श्रीमंत होत जाईल व गरीब हा गरीबीच्या खाईत गुदमरून मरेल.करीता गरीब वर्ग व कामगार वर्ग यांच्या प्रती गांभीर्य बाळगून सरकारने कडक नियमावली आखली पाहिजे. तेव्हाच कामगार वर्ग सुखाने जगेल व योग्य न्याय प्राप्त होईल. भारत सरकारने कामगार दिनाचे औचित्य साधून कामगारांच्या प्रती मोठे पाऊल उचलण्याची गरज आहे. देशा-तील दिड करोड ईपीएस-१९९५ पेंशन धारकांचा प्रश्न अजुनही रडखडलेला आहे. त्यावरसुध्दा भारत सरकारने गांभीर्याने विचार करून अंतिम निर्णय घ्यायला हवा. पेंशनधारकांची एकच मागणी आहे की कमीत कमी ७५०० रुपये पेन्शन, महागाई भत्ता व आरोग्य सुविधा मिळावी.एवढे कार्य सरकारने केले तर ईपीएस-९५ चा पेन्शन धारक धन्य होईल.परंतु सरकार व ईपीएफओ पळवाटा काढतांना दिसतात.सरकारने कामगारांच्या जखमेवर फुंकर घालावी. यालाच खरा कामगार दिवस समजल्या जाईल. कारण ज्या देशाचा कामगार सुखी तो देश सुखी हे ही तितकेच सत्य आहे.सध्याच्या परीस्थितीत कामगार चळवळी संपुष्टात आल्या आहेत. त्यामुळे सरकारच कामगारांचे सर्वेसर्वा आहेत.अशा परीस्थितीत सरकारनेच कामगारांच्या प्रती योग्य पाउले उचलुन दिलासा दिला पाहिजे.कारण भारता-तीलच नाही तर संपूर्ण जगातील कामगार वर्ग अत्यंत संवेदनशील आहेत. त्यामुळे त्यांच्या कार्यकुशलतेचा मोबदला त्यांना मिळायलाच पाहिजे.कारण कामगार हा जगाचा आधारस्तंभआहे.या आधारस्तंभाला टिकवुन ठेवण्याची जबाबदारी भारतासह संपूर्ण जगाची आहे. कामगारांच्या प्रती सहानुभूती,सहकार्याची भावना सरकारने व भांडवलशाही वर्गाने अंगीकारली पाहिजे. यातच खऱ्या अर्थाने कामगार दिवसाची प्रतीमा दिसून येईल.देशाचा राजकीय पुढारी कामगार दिनाच्या निमित्ताने कामगारांना योग्य न्याय देण्याचे वचन देत असेल व त्यांच्या प्रती आदर ठेवत असेल तरच याला खऱ्या अर्थाने कामगार दिवस समजल्या जाईल. जगातील बदलते हवामान पह-ाता कामगार दिनाचे औचित्य साधून भारतासह जगातील देशांनी या दिवस-ाला मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करून कामगार दिवस साजरा करावा.यामुळे निसर्ग प्रफुल्लित राहील.जय हिंद!



**रमेश लांजेवार**
(प्रदेश प्रवक्ता)
(महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना)
मो.नं.९९२१६९०७७९,
नागपूर.

# विंचूरला विजेचा लपंडाव, नागरीक त्रस्त

विंचूर (प्रतिनिधी) - गेल्या तीन ते चार महिन्यांपासून विंचूरला दर तास अर्धा तासाने विजेचा लपंडाव सुरू आहे. सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरु आहे .यावर्षी उन्हाने तर कहरच केला आहे. सुर्य आग ओकतोय दुपारच्या वेळी तर तापमानाने ४० ते ४१ अंशाचा उच्चांक गाठलेला असतो.आणि भर उकाड्याच्या वेळी विजेचा लपंडाव सुरु असतो. विजे अभावी फॅन, कुलर असून अडचण नसून खोळंबा ठरत आहेत.

जीवघेण्या उकाड्यामुळे लहान मुलं वृद्धांचा जीव अगदी कासावीस होतो.परंतू महावितरणला याच्याशी काही एक देणे घेणे नाही. विजेच्या .नित्याच्या विज समस्येला वैतागलेल्या येथील काही सधन कुटुंबांनी घराच्या छतावर सोलर पॅनल बसविले. काहींनी इन्व्हर्टर बसविले.तर काहींनी नाशिक सारख्या शहराकडे पलायन केले. मात्र सर्वसामान्य नागरिकांना महावितरणचा छळ सोसल्या वाचून गत्यंतर नाही. दुरुस्तीच्या नावाखाली आठवड्यातून एक दोन दिवस अर्धा अर्धा दिवस विज पुरवठा खंडित केला जातो.त्या व्यतिरिक्त दर अर्ध्या पाऊण तासाच्या अंतराने दिवसातून दहा ते पंधरा वेळेस विज गायब होते ते वेगळेच. त्यामुळे विजेवर चालणारे व्यवसाय व ऑनलाईन व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकांचे व्यवसाय विजे अभावी ठप्प तर होतातच. त्याचबरोबर नागरिकांनाही उकाडा सहन करत विजेची वाट बघत तिष्ठत रहावे लागते.

विजेच्या कमी जास्त दाबामुळे ऑनलाईन व्यावसायिक, बँका, पतसंस्थांचे संगणक, संगणकांचे सी.पी.यु सारख्या उपकरणांमध्ये बिघाड होत आहेत. घरातील विजेचे बल्ब, फ्रिज, चार्जिंगला असलेले भ्रमणध्वनी आदी खराब होऊन नागरिकांना नाहक आर्थिक भुर्दंड सोसावा लागतो. शेतकरी विहिरीवर जाऊन विद्युत पंप सुरू करुन बारं देण्यासाठी पिकापर्यंत येईस्तोवर विज गुल झालेली असते.

# नांदगाव शहरात महात्मा बसवेश्वर जंयती मोठया उत्साहात साजरी

**दै. आवाज वृत्तसेवा...**




नांदगाव प्रतिनिधी - अक्षय तृतीया वीरशैव लिंगायत समाजाचे धर्म प्रसारक जगत ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या जयंती निमित्ताने नांदगाव शहरातील तहसील कार्यालयासह विविध सरकारी कार्यालयामध्ये तसेच बाजार समितीमध्ये महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पुजन करून पुष्पहार घालून जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली .

नांदगाव कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सचिव अमोल खैरनार व्यापारी असोसिएशनच्या वतीने व्यापारी भूषण धूत यांनी महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार घालून जयंती साजरी केली. यावेळी बाजार समितीचे जितेंद्र गरुड' बाबासाहेब साठे 'शरद आ-हेर ' योगेश आहेर सानप ' संचालक निलेश इपर व्यापारी भूषण धूत' दीपक कासलीवाल ' अमोल शिंदे ' अमोल आहेर 'मुकुंद खैरनार ' गोकुळ खैरनार ' सुनील आहेर ' आशिष पाटील' बाळा-साहेब गोराडे' रामनिवास करवा' ज्ञा-नेश्वर वाघ 'रोशन धूत' राहुल फोफलिया 'अमोल खैरनार 'सचिन बैरागी ' निलेश बोराडे 'संदीप फोफलिया' समाधान भोसले 'जीवन खैरणार आदीसह समितीचे कर्मचारी हमाल मापारी शेतकरी बांधव उपस्थीत होते .

# भुरट्या चोरांपासून नागरीकांनी सतर्क रहावे - एपीआय भास्करराव शिंदे

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**शरद लोहकरे, लासलगाव** - सध्या लग्नसराई व शाळांच्या सुट्ट्यांमुळे अनेक कुटुंबे बाहेर-गावी जात आहेत. परिणामी घरे अनेक दिवस कुलूपबंद असतात. याचा फायदा घेत परिसरात भुरट्या चोरांची टोळी सक्रिय झाली असून, बंद घरे त्यांच्या निशाण्यावर आहेत. यामुळे नागरिकांना आर्थिक फटका बसण्याच्या घटना घडत आहेत.



या पार्श्वभूमीवर लासलगाव पोलीस ठाण्याचे स.पो.नि भास्करराव शिंदे यांनी सर्व नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. त्यांनी सांगितले की, घर बंद करताना मौल्यवान वस्तू व रोकड घरात ठेवू नये. तसेच बाहेरगावी जाताना शेजाऱ्यांना कल्पना द्यावी. आपल्या परिसरात अन-ोळखी व्यक्ती, घरोघरी फिरणारे भटके किंवा विक्रेते आढळल्यास त्यांच्यावर संशयाने लक्ष ठेवावे. ते घरांची रेकी करत असल्याची शक्यता असते. अशा व्यक्तींना कोणतीही वैयक्तिक माहिती देऊ नये. विशेषतः पासपोर्ट साईज फोटो, आधार माहिती किंवा जन्मतारखेसारखी कागदपत्रे देणे टाळावे. काही व्यक्ती संशयास्पद वाटल्यास तात्काळ गावचे पोलीस पाटील किंवा लासलगाव पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा असे आवाहनही त्यांनी केले आहे.

***सध्या लग्नसराई आणि शाळा सुट्ट्यांमुळे अनेक घरे कुलूपबंद असतात. याचा फायदा घेऊन भुरट्या चोर सक्रिय झाले आहेत. नागरिकांनी घरात मौल्यवान वस्तू ठेवू नयेत, तसेच अन-ोळखी व्यक्तींवर लक्ष ठेवून सतर्क राहावे. कोणतीही संशयास्पद हालचाल दिसल्यास त्वरित पोलिसांशी संपर्क साधावा. - स.पो.नि भास्करराव शिंदे, लासलगाव पोलीस ठाणे***

# 'शेतकरी पोराच्या प्रेमात' कविता ठरली निर्णायक - एका मुलीचा क्रांतिकारी निर्णय!

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**निफाड** - निफाड तालुक्यातील भुसे येथील एक सुंदर सामाजिक परिवर्तन घडून आले आहे. शिवानी संतोष पानगव्हाणे या सुशिक्षित, विच-ारशील मुलीने आपल्या आयुष्याचा निर्णय एका कवितेने प्रेरित होऊन घेतला - आणि तो निर्णय म्हणजे शेतकरी मुलाशी लग्न करण्याचा!

शिवानीने कवी संदीप जगताप सर यांची शेतकरी पोराशी लग्न कर... ही कविता ऐकली. या कवितेतील भावना, शेतकऱ्याचे जीवन, त्याच्या संघर्षाची गाथा आणि त्यामागील स्वाभिमानाने तिला अंतर्मुख केले. ही कविता तिच्या चुलत्यांनी - विजय पानगव्हाणे यांनी संपूर्ण कुटुंबापर्यंत पोहोचवली आणि हळूहळू घरच्यांचेही मतपरिवर्तन झाले.

या कवितेच्या प्रभावातून प्रे-रणा घेऊन शिवानीने शेतकरी मुलाशी विवाह करण्याचा ठाम निर्णय घेतला. आज ती केवळ एका नववधूची भूमिका निभावत नाहीये, तर एका



नवक्रांतीचीही पायाभरणी करत आहे - जिथे शिक्षित मुली शेतकऱ्याशी लग्न करून मातीतल्या माणसांची साथ देत आहेत.

या घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी वर्गात एक नवचैतन्य निर्माण झाले आहे. या नववधू-वरांना महाराष्ट्रातील सर्व शेतकऱ्यांच्यावतीने पुढील आयुष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा आणि आशीर्वाद!

चला तर मग...
जगाच्या अन्नदात्याला साथ देऊ,
शेतीमातीची मालकीण होऊ!

हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक, भगवान नामदेव सोनवणे यांनी शार्प ऑफसेट, मालेगांव बस स्टँड समोर, मालेगांव येथे छापून ढासे मळा, सावता नगर, नांदगांव ता.नांदगांव, जि.नाशिक येथे प्रकाशित केले. सहसंपादक भाऊसाहेब हुजबंद (८९९९९२१९९४). या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या, लेख, जाहिराती यामधून व्यक्त झालेल्या मतांशी मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक, सहसंपादक सहमत असतीलच असे नाही. मुद्रण दोष संभवनीय. (नांदगांव न्यायकक्षेत) सर्व अधिकार सुरक्षित. मो. ९५४५९१०१७७ - ९२७२४५३९२१ email : nandgaonawaz@gmail.com

# मातोश्री फार्मसी महाविद्यालयाला मिळाले एनबीए मानांकन

**दै. आवाज वृत्तसेवा...**
**लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी –**
भौतिक सुविधा,गुणवत्ता, अध्ययन अध्यापनाचा दर्जा आणि उत्कृष्ट निकालाची परंपरा या सर्व गोष्टींची दखल घेऊन धानोरे येथील मातोश्री इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीला राष्ट्रीय मानांकन मंडळ नवी दिल्ली यांनी एनबीए मानांकित केले आहे .
सदरचे डी.फार्मसी २०१८ पासून सुरु असून डिप्लोमाच्या विद्यार्थ्यांना सातत्यपूर्ण शिक्षण देऊन महाविद्यालयाने आपली गुणवत्ता राखून ठेवली आहे.अतिशय कमी कालावधीत नावाला येणारे ग्रामीण भागातील पहिले डिप्लोमा फार्मसी महाविद्यालय ठरले आहे.
राष्ट्रीय मानांकन मंडळाकडून झालेल्या तीन दिवसीय परीक्षणात महाविद्यालयात घेणारे विविध कार्यक्रम,शैक्षणिक सुविधा,परिपूर्ण शिक्षक व विविध नामांकित कंपन्यांत होणारी विद्यार्थ्यांची प्लेसमेंट याची तपासणी केली.मागील तीन वर्षापासून महाविद्यालयाला राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे व्हेरी गुड मानांकन मिळत असून याचा फायदा एनबीए साठी झाला असल्याचे विभागप्रमुख डॉ.पवन आव्हाड यांनी सांगितले.
सदर प्रकियेमध्ये पालक आणि माजी विद्यार्थी यांचा हि सक्रिय सहभाग असतो.सर्व पालकांनी मातोश्री शिक्षण संस्थेत सुरु असणाऱ्या विविध उपक्रमाचे कौतुक केले तसे माजी अनेक माजी विद्यार्थ्यांनी त्यांच्या करीयर घडण्यामध्ये मातोश्री फार्मशी महाविद्यालयाचा खूप मोठा आहे वाटा असल्याचे आवर्जून सांगितले.
विविध सुविधांसोबतच अध्यक्ष किशोर दराडे, संचालक रुपेश दराडे, शिक्षक संकेत दशपुते, कल्याणी सोनावणे, राहुल कांबळे, विजयश्री कटारे, ज्योत्सना परदेशी, प्रतीक्षा कुवर, प्रसाद साताळकर, अमोल येवले, सुरज गायकवाड, बुद्धघोष खंडीझोड, कल्पेश वड्डकते व इतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.
येणाऱ्या काळात फार्मसीमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना एनबीए मानांकनाचा नक्कीच फायदा होईल असे सांगण्यात आले.




**संस्थेने दिलेल्या सुविधा, शिक्षकांची मेहनत व विद्यार्थ्यांचा निकाल या त्रिसूत्रीचा मानांकनात मोठा फायदा झाला असून यातून फार्मसीमध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांना नक्कीच फायदा होईल.**
**– रुपेश दराडे, संचालक, मातोश्री शिक्षण संस्था**

**एन. बी. ए. मानांकन मिळवणारे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील पहिले डिप्लोमा फार्मसी महाविद्यालय होण्याचा मान मिळाला,याचा आनंद होत असून सातत्यपूर्ण घेतलेली मेहनत व जिद्द याचे रूपांतर मानांकनात झाली याचा अभिमान वाटतो.कमी कालावधीत मोठे यश मिळाले असून विद्यार्थ्यांना पुढे घेऊन जाण्यासाठी सतत प्रयत्नशील राहू.**
**– डॉ.पवन आव्हाड,विभाप्रमुख**

# महापुरुषांच्या विचारांचे निरंतर कृतीशील अनुकरण केले पाहिजे : प्रा. पंकज भारतीय

**दै. आवाज वृत्तसेवा...**
बोरघर / माणगांव (विश्वास गायकवाड) सत्य हे कधीच लपत नाही. सत्यामुळेच जीवनाला आकार आणि आधार मिळत असतो असे प्रतिपादन प्रा. पंकज भारतीय यांनी महाड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयातील सम्यक जीवन दर्शन महोत्सवात बोलताना केले. महाड च्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयात, सुरु असलेल्या ' सम्यक जीवन दर्शन महोत्सव २०२५' चे दूसरे पुष्प गुंफताना अमरावती येथील प्रा. पंकज भारतीय हे बोलत होते.
यावेळी प्रा. पंकज भारतीय यांनी, महापुरुषांची जयंती उत्सव व आजची तरुणाई या संदर्भात अतिशय परखड शब्दात विचार मांडले. आज सर्वत्र महापुरुषांची जयंती ढोल, ताशे, लेझीम, डी जे यांच्या संगीतमय तालावर नाचून साजरी केली जात आहे. ज्या मधून आपल्याला क्षणिक आनंद मिळत असतो. मात्र, त्यांच्या प्रेरणादायी विचारांचे कृतीशील अनुकरण आणि त्यांची लोक कल्याणकारी चळवळ आपण पुढे नेताना आढळत नाही, आज त्याचीच गरज आहे असे प्रा. पंकज भारतीय यांनी आपल्या भाषणातून खंत व्यक्त केली. या वेळी त्यांनी संविधानातील अधिकार, हक्क, जवाबदारी, कर्तव्य काय व कसे आहेत आणि ते प्राप्त करण्यासाठी आपण कसे वागावे आणि जगावे याचा जीवन मुल्यात्मक मौल्यवान संदेश दिला.
डॉ बाबासाहेब आंबेडकर महा विद्यालयाचे प्राचार्य डॉ. योगेश बोराळे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात प्रा. पंकज भारतीय सरांनी जो विचारांचा प्रभाव दिला आहे, तो कायम तेवत ठेवा, असे विद्यार्थ्यांना आवाहन केले. यावेळी विद्यार्थी विद्यार्थिनी, प्राध्यापक, कर्मचारी, समाज कल्याण विभागची मुले आणि मुलींच्या वसतिगृहातील विद्यार्थी, विद्यार्थिनी, मोरे सर आणि मॅडम उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि त्रिशरण, पंचशीलेचे पठन पराग माने यांनी केले. प्रा.बाबासाहेब सोनकांबळे यांनी सर्व उपस्थितांचे आभार व्यक्त केले.




# 'पी.एस.आय. अर्जुन'मधील प्रमोशनल साँगला 'पुष्पा'फेम नकाश अजीज यांचा आवाज आणि सोबत सरप्राईज म्हणजे अंकुश चौधरीचा आवाज..

**दै. आवाज वृत्तसेवा...**
सुपरस्टार अंकुश चौधरीचा आगामी चित्रपट 'पी.एस.आय. अर्जुन' सध्या चांगलाच चर्चेत असून पोस्टर, टीझरने प्रेक्षकांची उत्सुकता प्रचंड वाढवली आहे. चित्रपटातील अंकुशच्या पॉवरफुल लूकने राडा घातला असतानाच अंकुश प्रेक्षकांसाठी एक सरप्राईज घेऊन आला आहे. 'पी.एस.आय. अर्जुन'मधील जबरदस्त 'धतड तटड धिंगाणा' हे प्रमोशनल साँग सध्या सोशल मीडियावर धुमाकूळ घालायला सज्ज असून या प्रमोशनल साँगच्या निमित्ताने स्टाईल आयकॉन अंकुशचा हा नवीन स्वॅगस्टर अंदाज प्रेक्षकांना चांगलाच भावत आहे. या गाण्याच्या एनर्जेटीक, कॅची बिट्समुळे हे गाणे सर्वत्र ट्रेंडिंग ठरत आहे. बॉलिवूडलचे प्रसिद्ध गायक ज्यांनी 'पुष्पा टायटल साँग', 'जबरा फॅन', 'क्यूटीपाय', ' स्लो मोशन' यांसारखे हिट गाण्यांचे गायक नकाश अजीज व अंकुश चौधरीच्या जबरदस्त आवाजातील या गाण्याला अनिरुद्ध निमकर यांनी कमाल संगीत दिले असून जयदीप मराठे यांनी गाण्याचे बोल लिहिले आहेत.
संगीतकार अनिरुद्ध निमकर म्हणतात, 'धतड ततड धिंगाणा' या गाण्याची चाल आणि कॅची संगीतामुळे ते अत्यंत धमाकेदार बनले आहे. या गाण्यातील काही संवाद गाण्याला आणखी आकर्षक बनवतात. आम्हाला वाटले, की जर अंकुश दादांच्या आवाजात हे गाणे सादर झाले तर ते अधिक जबरदस्त होईल आणि प्रेक्षकांना देखील अधिक भावेल. मात्र जेव्हा आम्ही त्यांना विचारले, तेव्हा ते यासाठी तयार नव्हते. त्यांच्या मते, नकाश अजीजसारख्या उत्तम गायकाचा आवाज असताना माझ्या आवाजामुळे गाण्यावर परिणाम होऊ शकतो. मात्र माझा आणि नकाशचा हट्ट होता की हे गाणे अंकुश दादांच्या आवाजातच व्हायला हवे. त्यामुळेच आज या गाण्याला प्रेक्षकांकडून प्रचंड प्रतिसाद मिळत आहे.
निर्माते विक्रम शंकर म्हणतात, पी.एस.आय. अर्जुन या चित्रपटातील अंकुशच्या रुबाबदार, दमदार भूमिकेला शोभेल, असे हे प्रमोशनल साँग त्याच्याच आवाजात प्रेक्षकांसाठी घेऊन आलो आहे. हे गाणे बॉलिवूडला जबरदस्त गाणी देणाऱ्या नकाश अजीज यांनी गायले असून त्यात सुपरस्टार अंकुश चौधरी यांच्या रॅपने अधिक रंगत आणली आहे. संगीतप्रेमींना हे गाणे आवडतेय, यातच आनंद आहे.
व्हिस्ट्रोमॅक्स सिनेमा, ड्रिमविव्हर एंटरटेनमेंट निर्मित 'पी.एस.आय.अर्जुन'चे भूषण पटेल दिग्दर्शक आहेत तर विक्रम शंकर आणि ध्रुव दास निर्माते आहेत. येत्या ९ मे २०२५ रोजी चित्रपट प्रदर्शित होणार आहे.




## कामगार दिन




**दै. आवाज वृत्तसेवा...**
यांत्रिकीकरण अन्
खाजगीकरणच्या कचाट्यात
सापडलाय आजचा कामगार
सरकारच्या जात्यात सरसकट
भरडला जाणारा आजचा
कर्मचारी आपले अस्तित्व
टिकवण्यासाठी
रोजच धडपडतोय ..
कधी पगार वाढीसाठी
तर कधी कायम टिकून
राहण्यासाठी तो आपल्या
अस्तित्वाची लढाई
जिंकण्यासाठी
आपल्या हक्काच्या मागण्यासाठी
करतोय तो कधी संप
तर कधी आमरण उपोषण
महाराष्ट्रातील सर्वसामान्य
कर्मचाऱ्यावर का यावी ही
उपासमारीची वेळ त्याच्यावर
त्याच्या कुटुंबावर.. आज ही
कर्मचाऱ्याची होणारी पिळवणूक
थांबणार का?
समान काम समान वेतन..
हे फक्त अश्वासनच ठरणार
का?
शेवटच्या घटकापर्यंतच्या
सर्वांना न्याय मिळणार का?
खरंच कामगार दिनाच्या
निमित्ताने
सरकार कामगाराच्या हिताचे
निर्णय घेणार का?
**कवी शांताराम वाघ. मनमाड**
**मो.८०८७४९३४५३.**

दररोज वाचा
दैनिक आवाज

# मुक्ता आर्टस् निर्मित आणि लोकेश गुप्ते दिग्दर्शित नवा मराठी चित्रपट 'अमायरा' चे पोस्टर प्रदर्शित !!

**दै. आवाज वृत्तसेवा...**
जेव्हा एखादा चित्रपट चांगला आशय देतो तेव्हा तो प्रेक्षकांना आकर्षित करतो. मराठी सिनेमे सध्या संपूर्ण देशभरात आणि जगभरात प्रचंड यश मिळवत आहे. असाच एका हृदयस्पर्शी नवीन विषयासह सुभाष घाई यांच्या मुक्ता आर्टस् निर्मित आणि लोकेश गुप्ते दिग्दर्शित, ए व्ही के एंटरटेनमेंट आणि महलसा एंटरटेनमेंट च्या अंतर्गत नवा मराठी चित्रपट अमायरा आपल्या भेटीला येणार आहे. या सिनेमाचा पोस्टर नुकताच प्रदर्शित करण्यात आला.
पोस्टरवर आपण आपल्या लाडक्या मराठी कलाकारांना पाहू शकतो. अजिंक्य देव, राजेश्वरी सचदेव, पूजा सावंत हे मराठी सिनेश्रुष्टीतील उत्तम कलाकार असून त्यांचं काम प्रेक्षकांनी अनुभवलंय आणि त्यांना भरपूर प्रेम सुद्धा दिलंय. पण विशेष आकर्षण ठरते ती म्हणजे लोकप्रिय सोशल मीडिया इन्फ्लुएंसर सई सचिन गोडबोले. अद्भुत आणि उत्तम कलाकारांसोबत सईची जुगलबंदी बघण्यासारखी असणार आहे. पोस्टर वरून अंदाजा येतो कि ह्या सिनेमाचं चित्रीकरण बाहेरदेशात केलं गेलंय. पण नक्की सईचं अजिंक्य देव, राजेश्वरी सचदेव आणि पूजा सावंत सोबतचं नातं काय? या कलाकारांची चित्रपटात काय भूमिका असणार आहे ? हे येत्या १६ मे २०२५ ला कळेल.
'अमायरा' चित्रपटा मधील सर्व गाणी प्रसिद्ध म्युझिक लेबल टिप्स म्यूझिक ने अधिकृतपणे हस्तगत केली आहेत. टिप्स म्यूझिक सारख्या मोठ्या म्यूझिक प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून या गाण्यांना अधिक व्यापक प्रेक्षकवर्ग मिळेल. अमायराच्या संगीताचा अनुभव घेण्यासाठी रसिक प्रेक्षक उत्सुक आहेत.
या सिनेमाचे दिग्दर्शक लोकेश गुप्ते हे असून लेखक मिहीर राजदा आहेत. तसेच राहुल पुरी, स्वाती खोपकर, सुरेश गोविंदराय पै निर्माते आहेत. तर सह निर्माते निनाद नंदकुमार बत्तीन आणि तबरेज पटेल आहेत. या सिनेमाला संगीत रोहित राऊत ने दिलं आहे. 'अमायरा' हा चित्रपट १६ मे २०२५ ला सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे.



# खेडलेझुंगे जि प शाळेचा चौथीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न

**दै. आवाज वृत्तसेवा...**

शरद लोहकरे, लासलगाव – जि प प्राथ. शाळा खेडले झुंगे येथे इयत्ता चौथीच्या वर्गाचा निरोप समारंभाचा कार्यक्रम अगदी खेळीमेळीच्या उत्साहाच्या व भावुक वातावरणात पार पडला. कार्यक्रमाची संपूर्ण धुरा वर्गशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी सांभाळली .कार्यक्रमाचे प्रास्ताविक कुमारी अनन्या घोटेकर या विद्यार्थिनीने केले त्यात शाळेचे मुख्याध्यापक आदरणीय श्री गुजर सर यांना अध्यक्ष स्थान व इयत्ता चौथीची विद्यार्थिनी कुमारी श्रावणी अष्टेकर हिला पण विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून उपाध्यक्ष स्थान दिले कुमारी प्रणाली घोटेकर हिने अनुमोदन दिले यानंतर चिमुकल्यांची भाषण..सुरू झाली. आराध्या गोरडे हिने आमच्या ह्या टीचरसारख्याच टीचर नवीन शाळेत शिकवायला भेटतील का अशी खंत व्यक्त केली. अनन्या घोटेकर हिने मला या शाळेत माझ्या सर्व कलागुणांना वाव मिळाल्यामुळे जि प अध्यक्ष चषक स्पर्धेत इयत्ता दुसरी पासून चौथीपर्यंत केंद्र ते तालुकास्तरापर्यंत नंबर पटकावत मेडल व प्रमाणपत्रांची रेलचेल झाली सई गीते हिने सुद्धा शाळेतील आनंददायी वातावरणामुळे व वर्ग शिक्षकांच्या प्रेरणेमुळे व मार्गदर्शनामुळे मला अध्यक्ष चषक मध्ये गायन व वक्तृत्व स्पर्धेत वाव मिळाल्यामुळे जिल्हास्तरापर्यंत नंबर येऊन निफाड तालुक्याचे प्रतिनिधित्व करण्याचा मान मिळाला असे आपल्या मनोगतातून व्यक्त केले. त्याचप्रमाणे दूर्वा गोसावी , श्रेया गोसावी , आराध्या गायकवाड ,हिमांशू हागोटे ,साहिल कासार , तन्वी पवार , समृद्धी अष्टेकर , प्रणाली घोटेकर , राधिका साबळे , अंजली माळवे , स्नेहल गीते ,शिवन्या डहाळे ,आणि विशेष म्हणजे लाजरी बुजरी खुशी पवार हिने सुद्धा अगदी भावुक होऊन या शाळेत



आपल्यावर झालेले संस्कार व प्रगती यावर मनोगत व्यक्त केले. आई-वडिलांपेक्षाही शिक्षकांनी इतके प्रेम केले ही भावना त्यांच्या मनाला भावली व त्या प्रसंगी सर्व विद्यार्थ्यांचे व आलेल्या पाहुण्यांचे हृदय भरून आले व डोळे पानावले. चिमुकल्यांच्या भाषणनंतर उपस्थित सर्व माताभगिनींनी आपल्या पाल्यांमध्ये शिक्षकांनी केलेले चांगले बदल त्यांची शैक्षणिक प्रगती विविध स्पर्धांमध्ये भाग घेण्यास दिलेले प्रोत्साहन केलेले प्रेम या सर्व गोष्टींवर प्रभावित होऊन त्यांनी आपल्या भाषणातून शिक्षकांचे कौतुक केले व समाधान व्यक्त केले. नंतर इयत्ता चौथीच्या वर्गशिक्षिका श्रीमती निर्मला आवारे यांनी विद्यार्थ्यांच्या पहिली पासून ते चौथीपर्यंतच्या सर्व आठवणींना उजाळा देत विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. यानंतर बाल अध्यक्ष कुमारी श्रावणी अष्टेकर या विद्यार्थिनीने आपल्या मनोगतातून इयत्ता पहिलीच्या वर्गापासून तर चौथीपर्यंतचा शैक्षणिक प्रवासातील अनुभव व आठवणी जाग्या केल्या त्यामुळे उपस्थित सर्वांचे डोळे पाणावले व भावना दाटून आल्या .शाळेचे मुख्यध्यापक श्री गुजर सर यांनी सुद्धा आपल्या अध्यक्ष भाषणातून शाळेत राबविण्यात येणारे विविध नाविन्यपूर्ण उपक्रमाद्वारे आम्ही विद्यार्थ्यांना आनंददायी शिक्षण देतो त्यामुळे शाळेची विद्यार्थी संख्या पटसंख्या टिकून आहे सर्व शिक्षक प्रामाणिकपणे पोट तिडकीने ज्ञानदानाचे कार्य करीत आहेत असे सांगितले. शेवटी कुमारी समृद्धी अष्टेकर हिने शब्द सुमनांनी उपस्थित सर्व माता भगिनी पालक बंधू फोटोग्राफर सचिन बोठे शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष ,उपाध्यक्ष , सदस्य , मुख्याध्यापक व सर्व शिक्षक बंधू भगिनी जि प शाळा खेडलेझुंगे यांचे आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक आदरणीय श्री गुजर सर ,श्रीमती निर्मला आवारे , विजय खैरनार ,श्रीमती अनिता सोनवणे ,अनिल गुरुळे, विकास यादव आदींनी परिश्रम घेतले.

शेवटी सर्व उपस्थित पालक वर्ग विद्यार्थी व शिक्षक यांनी मिष्टान्न भोजनाचा आस्वाद घेतला .अशा प्रकारे इयत्ता चौथीच्या वर्गाचा निरोप समारंभाचा भव्य दिव्य कार्यक्रमाचा शेवट गोड झाला .

# यंदाची उन्हाळ्याची सुट्टी असणार कुल !
## १६ मे रोजी प्रदर्शित होणार 'एप्रिल मे ९९'

**दै. आवाज वृत्तसेवा...**

सध्या उकाडा प्रचंड वाढलेला असतानाच हा उकाडा सुसह्य करण्यासाठी 'एप्रिल मे ९९'चा मस्तीने भरलेला चित्रपट येत्या १६ मे रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. कृष्णा, प्रसाद, सिद्धेश आणि जाईची धमाल मस्ती यात दिसत असून प्रत्येकाला आपल्या सुट्टीची आठवण करून देणारा हा जबरदस्त चित्रपट आहे.

आजच्या इंटरनेट आणि स्मार्टफोनच्या दुनियेत सुट्ट्यांचा आनंद स्क्रीनवरच मर्यादित राहिला आहे. परंतु एक काळ असा होता, जेव्हा ना स्मार्टफोन्स होते, ना वायफाय, तेव्हा उन्हाळ्याच्या सुट्टीचा आनंद गावाला जाऊन गावभर हुंदडण्यात, नदी, समुद्रावर फेरफटका मारण्यात, सायकलवरून फिरण्यात, सूर्य डोक्यावर येईपर्यंत झोपण्यात आणि बर्फाचे गोळे खाऊन लुटला जायचा. अशीच मजामस्ती 'एप्रिल मे ९९' मध्ये पाहायला मिळणार आहे. काही दिवसांपूर्वी प्रदर्शित झालेल्या टीझरमध्ये, गाण्यांमध्ये कृष्णा, प्रसाद, सिद्धेश ही खोडकर मुलं आणि त्यांच्या जोडीला समंजस जाई सुट्टीचा मनमुराद




आनंद दिसत असून मोठ्यांना नॉस्टॅलजिक करणारा आणि तरुणाईला खऱ्या सुट्टीची व्याख्या सांगणारा हा चित्रपट आहे. या चित्रपटातील 'ताकुंबा' हे गाणेही सध्या प्रचंड गाजतेय. धमाल, मस्ती आणि एनर्जीने भरलेले हे गाणे रोहन-रोहन यांनी संगीतबद्ध केले असून त्यांचाच जबरदस्त आवाज या गाण्याला लाभला आहे. विशेष म्हणजे या गाण्याचे शब्द दिग्दर्शक रोहन मापुस्कर व गीतकार प्रशांत मडूपवार यांनी लिहिले आहेत. सगळ्यांना थिरकायला लावणाऱ्या या गाण्याचे नृत्य दिग्दर्शन स्टॅनली डिकॉस्टा यांनी केले आहे. तर 'समर हॉलिडे' हे गाणे भूमी प्रधान, रोहन गोखले, रोहन प्रधान यांनी गायले असून रोहन - रोहन यांचे संगीत लाभलेल्या हा धमाल गाण्याला प्रशांत मडपुवार, रोहन गोखले यांनी शब्दबद्ध केले आहे.

मापुस्कर ब्रदर्स इन असोसिएशन फिंगर प्रिंट फिल्म्स, नेक्सस अलायन्स, थिंक टँक आणि मॅगीज पिक्चर्स प्रस्तुत 'एप्रिल मे ९९' या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन रोहन मापुस्कर यांनी केले असून राजेश मापुस्कर, मधुकर कोटीयन, जोगेश भूटानी , मॉरिस नून हे निर्माते आहेत तर लॉरेन्स डिसोझा सह निर्माते आहेत. यात आर्यन मेंगजी (कृष्णा), श्रेयस थोरात (प्रसाद) आणि मंथन काणेकर (सिद्धेश) आणि साजिरी जोशी (जाई) यांच्या भूमिका आहेत. येत्या मे महिन्याच्या सुट्टीत म्हणजेच १६ मे रोजी हा चित्रपट सर्वत्र प्रदर्शित होणार आहे.

# सजना चित्रपटातील आभाळ रातीला या नवीन गाण्याने रसिकांच्या हृदयाला दिला नवा स्पर्श

**दै. आवाज वृत्तसेवा...**

प्रेम, नाते संबंध आणि भावना यांची सुरेल गुंफण मांडणारा बहुप्रतीक्षित मराठी चित्रपट सजना या चित्रपटातील नवीन गाणं आभाळ रातीला प्रेक्षकांच्या भेटीला आलंय. प्रेम ही भावना केवळ शब्दांतून नाही तर सूरांतूनही अनुभवता येते. 'आभाळ रातीला ' हे गाणं त्या प्रेमभावनेचा एक सुंदर अनुभव आहे. मराठी संस्कृतीच्या ठेव्याला उजाळा देणारा आणि परंपरेचा अभिमान जागवणारा हे गाणं आहे. या गाण्यात ढोल-ताशाचा गगनभेदी नाद, लेझीमच्या तालावर अस्सल मराठी पोशाख मध्ये नाचणारी तरुणाई आणि मुख्य अभिनेते आणि देवीच्या मंगलमय स्तुतीचा संगम रसिकांना अनुभवता येतो.

गाण्याच्या चित्रीकरणात देखील मोठ्या मिरवणुका, ढोल-ताशाचे पथक आणि सजीव लेझीम नृत्य यांचा भव्य प्रदर्शन करण्यात आलं आहे. हे गाणे केवळ मनोरंजन नसून मराठी संस्कृतीच्या गाढ प्रेमाचा आणि परंपरेच्या जपणुकीचा एक सुंदर सोहळा आहे ज्याच्या प्रत्येक ठोक्यातून मराठी अस्मिता झळकते.

सुहास मुंडे यांच्या शब्दरचनेमुळे गाण्यात प्रेमभावना अधिक खुलून



आल्या आहेत. गाण्याचे चित्रीकरण सुद्धा अतिशय नयनरम्य आहे. ह्या गाण्याचे संगीतकार ओंकारस्वरूप हे आहेत. तर गायक आदर्श शिंदे आणि राजेश्वरी पवार हे आहेत.

सजना चित्रपट लवकरच संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार असून, या गाण्यामुळे चित्रपटाबद्दलची उत्सुकता आणखी वाढली आहे. शशिकांत धोत्रेंचा हा पहिलाच रोमँटिक सिनेमा आहे. या चित्रपटाची निर्मिती स्वतः शशिकांत धोत्रे ह्यांनी केली आहे तर कथा, पटकथा, संवाद आणि दिग्दर्शन सुद्धा शशिकांत धोत्रे ह्यांनी केलं आहे. 'सजना' सिनेमा २३ मे २०२५ पासून प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी सज्ज आहे.

# मान्यवरांच्या उपस्थितीत रंगली 'अशी ही जमवा जमवी' ची स्टार-स्टडेड संध्याकाळ!

**दै. आवाज वृत्तसेवा...**

कौटुंबिक मूल्यं, नातेसंबंधांची गुंफण आणि हलक्याफुलक्या विनोदांनी परिपूर्ण असा 'अशी ही जमवा जमवी' हा मराठी चित्रपट नुकताच प्रेक्षकांच्या भेटीला आला आणि चित्रपटाला प्रेक्षकांचा भरभरून प्रतिसाद मिळाला. सहज संवाद, दिलखुलास अभिनय आणि भावनिक कथानक यामुळे प्रेक्षकांनी चित्रपटाचे विशेष कौतुक केले आहे.

नुकतेच 'अशी ही जमवा जमवी' या सिनेमाचे मुंबईत विशेष स्क्रिनिंग आयोजित करण्यात आले होते याला अनेक मराठी आणि हिंदी सेलिब्रिटींनी हजेरी लावली. इतकच नव्हे तर या विशेष स्क्रीनिंगला राज्याचे माहिती व तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक कार्य मंत्री आ. आशिष शेलार यांनी सुद्धा उपस्थिती लावली आणि चित्रपटाच्या टीमशी मनमोकळा संवाद साधला. तसेच ज्येष्ठ चित्रपट निर्माता



व मुंबई चित्रपट महोत्सवाचे अध्यक्ष किरण शांताराम आणि अनेक मान्यवर कलाकारांनी हजेरी लावून चित्रपटाच्या टीमला शुभेच्छा दिल्या.

ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ, वंदना गुप्ते तसेच प्रसिद्ध विनोदवीर जॉनी लिव्हर, सचिन पिळगांवकर , भरत जाधव, सुनील बर्वे, चैत्राली गुप्ते, ओमकार कुलकर्णी, तनिष्का विशे, संगीतकार अमितराज यांच्यासह अनेक कलाकारांनी खास हजेरी लावली. सेलिब्रिटींच्या उपस्थितीमुळे संपूर्ण वातावरणात उत्साह आणि जल्लोष होता. अशी ही जमवा जमवी हा चित्रपट राजकमल एंटरटेनमेंटच्या बॅनरखाली प्रदर्शित झाला असून, व्ही. शांताराम यांचे नातू राहुल शांताराम यांचे हे पहिले निर्मिती आहे. राजकमल एंटरटेनमेंट प्रस्तुत, लोकेश गुप्ते दिग्दर्शित अशी ही जमवा जमवी या सिनेमाने प्रेक्षकांच्या मनात एक चांगली छाप सोडली आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभेच्छा

**दै. आवाज वृत्तसेवा...**

मुंबई : – महाराष्ट्र देशाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावत असून, आपल्या सर्वांच्या प्रयत्नातून, सहकार्यातून आणखी प्रगत, संपन्न महाराष्ट्र साकारण्यासाठी कटिबद्ध होऊया, असे आवाहन करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील नागरिकांना महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. यानिमित्ताने मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिराव फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि आदी सर्व महान समाजसुधारकांना विनम्र अभिवादन केले आहे. महाराष्ट्र दिनाच्या पूर्वसंध्येला दिलेल्या संदेशात मुख्यमंत्री म्हणतात, महाराष्ट्राची स्थापना ज्यांच्या बलिदानातून सत्यात आली त्या सर्व हुतात्म्यांना विनम्र आदरांजली अर्पण करतो. महाराष्ट्राने आपले थोरपण देशाच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय प्रगतीमध्ये महत्वाचे योगदान देत सिद्ध केले आहे. महाराष्ट्राने गेल्या ६५ वर्षात उद्योग, शिक्षण, आरोग्य, कृषी, कला, क्रीडा ,साहित्य ,सामाजिक न्याय अशा अनेक क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती केली आहे. मराठी भाषा, मराठी संस्कृती आणि मराठी साहित्य हा आपल्या अस्मितेचा आत्मा आहे. ही ओळख जपणे आणि पुढच्या पिढीकडे पोहोचवणे हे आपले कर्तव्य आहे. महाराष्ट्र शुरवीर नरोत्तमांची पावनभूमी आहे. तशीच ती समाजसुधारकांची आणि स्वातंत्र्ययोद्ध्यांची आहे. सामाजिक प्रबोधनाचा लाभलेला वारसा, राज्यात नांदणारी शांतता, कायदा सुव्यवस्था , नैसर्गिक साधनांचा सदुपयोग करण्याचे नियोजन, प्रतिभावंत नागरिक आणि कष्ट करण्याची तयारी असणारी युवा पिढी यामुळे जागतिक पातळीवर महाराष्ट्राने आपली ओळख निर्माण केली आहे.